Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# पर्यावरण शिक्षण

**सौ. जोशी वसुधा समीर,**
**ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक-2.**

**प्रास्ताविक:-**

आजच्या जगातील अनेकविध समस्यांपैकी प्राधान्याने व तातडीने लक्ष पुरविले पाहिजे अशी एक समस्या म्हणजे 'पर्यावरण संरक्षण होय.' सध्याचे पर्यावरण प्रदुषित असून मानवासहित सर्व सजीवाना जे घातक आहे अशा परिस्थीतीमुळेच 'पर्यावरण शिक्षण' आज अधिकाअधिक महत्वाचे आणि गरजेचे साधन झाले आहे. पुरातन काळापासून आपल्या संस्कृतीत पर्यावरणाचे संर्वधन, संरक्षण, संतुलन याला महत्व दिले आहे. पर्यावरण व मानव यांचा घनिष्ठ संबंध आहे. शुद्ध पर्यावरण राखण्याची जबाबदारी मानवाचीच आहे. औद्योगिकरण, लोकसंख्येतील प्रचंड वाढ, शहरीकरण, खनिज तेलांचा वापर, जंगल तोड, किटकनाशके व रासायनिक खतांचा अमर्याद वापर, जल, वायु, भूमी, ध्वनी प्रदुषण, जिवाष्म इंधनाचा ऱ्हास, ओझोनक्षय, अवर्षण, महापूर, यामुळे पर्यावरण संतुलन बिघडते. त्याचा परिणाम मानव व सजीव सृष्टीवर होत आहे. मानवाचे अस्तित्व आणि विकास पर्यावरणाच्या गुणवत्तेवरच अवलंबून आहे. म्हणून आपल्या वसुंधरेला या प्रदुषण व इतर समस्यांच्या विळख्यातून सोडविणसाठी पर्यावरण शिक्षणाची नितांत गरज आहे. 1960 मध्ये लंडनमध्ये पसरलेल्या विषारी धुक्याने चाळीस हजाराहून अधिक व्यक्तींचा बळी घेतल्यानंतर पर्यावरणाविषयक जागृतीस सुरवात झाली. 1960 ते 70 च्या दरम्यान हवा, पाणी, नद्या, जंगले, वन्यजीवन, समुद्र, इ. बाबत अनेक असे प्रसंग घडले की ज्यामुळे मानवी पर्यावरणातील वाढत्या प्रमाणातील वैचित्र समोर आले. पर्यावरण शिक्षणाद्वारे व्यक्तीला पर्यावरणातील विविध घटक, त्यांचे परस्परांवर अवलंबून असणे, पर्यावरणीय समस्या व त्यावरील उपाय, पर्यावरण संरक्षण व संवर्धन याबाबतचे ज्ञान प्राप्त होईल. पर्यावरण जनजागृती तसेच व्यक्तीमध्ये पर्यावरणाबाबत सकारात्मक अभिवृत्ती व मूल्ये विकसित होतील. यासाठी पर्यावरण शिक्षण ही आजच्या काळाची महत्वपूर्ण गरज झाली आहे. बदलत्या समाजाच्या गरजा लक्षात घेऊन पर्यावरण शिक्षण हे महत्वाचे आहे.

**पर्यावरण व्याख्या :- (Definations of Environment)**

अनेक तज्ञांनी पर्यावरणाच्या केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे-

- पर्यावरणाचे व्यवस्थापन व अभ्यासाकरीता वेगवेगळ्या विज्ञानाचा वापर करणे म्हणजे पर्यावरणशास्त्र होय-पुल डो अँडरसन.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

- विविध परिसंस्था प्रणालीचे परस्पर संबंधातील संतुलन मूलक तत्वांचा शास्त्रीय अभ्यास म्हणजे पर्यावरणशास्त्र होय-बर्नाड नेबेल.
- कोणत्याही बाह्य शक्तीचा होणारा परिणाम म्हणजे पर्यावरण होय- डॉ. रॉस.
- पृथ्वीवरील सर्व घटकांचे आकलन त्याचा मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास म्हणजे पर्यावरण शास्त्र होय-जॉन टर्क.

**पर्यावरण शिक्षण व्याख्या:-**

- NAAEE ने 1993 मध्ये मांडलेली व्याख्या बहुव्यापी आहे. "वैश्विक अर्थव्यवहारात सक्षम असणारे योग्य निर्णय घेण्यासाठी कौशल्ये, ज्ञान व इच्छा असणारे समाजाचे घटक म्हणून आपले हक्क व जबाबदाऱ्या यांच्या विषयी जागरूक असणारे 'पर्यावरण-साक्षर' नागरिक निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजे पर्यावरण शिक्षण. "
- "पर्यावरण शिक्षण हे काही विशिष्ट समस्यांवर केंद्रीत झालेले असते. उदा. मूल्यांचे उदीकरण, समाजाचे कल्याण, मानवाचे अस्तित्व आबाधित राखणे, विद्यार्थ्यांच्या कृतिशिलतेचा आधार घेणे इ. व या सर्वांमधून सद्यस्थितीचा आणि भविष्याचा वेध घेणे." युरोपियन अहवाल.
- "पर्यावरण रक्षणाची उदिष्ट्ये कार्यान्वित करण्याचा एक मार्ग म्हणजे पर्यावरण शिक्षण." फिनिश नॅशनल कमिशन (1974)
- UNESCO (1976) अहवाल-"पर्यावरणाब–ल एकत्रिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी विविध विद्याशास्त्रांचे व शैक्षणिक अनुभवांचे पुर्नउदबोधन व सांधे जुळणी करण्याचे फलित म्हणजे पर्यावरण शिक्षण होय."
- "पर्यावरणाचे आकलन, पर्यावरणाचा मानवासह इतर सजीवांवर होणारा परिणाम, पर्यावरण विषयक समस्या, त्यांचे निराकरण म्हणजे पर्यावरण शिक्षण होय."
- "आपले हक्क व जबाबदाऱ्या या विषयी जागरूक राहून साक्षर नागरिक निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजे पर्यावरण शिक्षण."

**पर्यावरण शिक्षणाची उार्दष्ट्ये :-** संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघ या संस्थेने राष्ट्रीय स्तरावर पर्यावरण शिक्षणाची सर्वसाधारण उदिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगितली आहे.

1) **जाणीव जागृती :-** व्यक्तीमध्ये पर्यावरण व पर्यावरणविषयक समस्यांची जाणीव जागृती करणे.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

2) **ज्ञान :-** व्यक्तीला पर्यावरण, पर्यावरण समस्या व त्या सोडविण्यासाठीचे उपाय याबद्दल ज्ञान देणे व त्याचे आकलन होण्यास मदत करणे.

3) **अभिवृत्ती :-** व्यक्तीमध्ये पर्यावरणाविषयी सकारात्मक अभिवृत्तीचा विकास करणे.

4) **मूल्ये :-** व्यक्तीमध्ये पर्यावरणाविषयी सकारात्मक मूल्ये निर्माण करणे.

5) **कौशल्ये :-** पर्यावरण समस्या सोडविण्यासाठी व्यक्तीमध्ये आवश्यक कौशल्यांचा विकास करणे.

6) **सहभाग :-** पर्यावरण संरक्षण, संवर्धन आणि पर्यावरण समस्या सोडविण्यासाठीचे उपक्रम व चळवळींमध्ये व्यक्तीचा सक्रीय सहभाग प्राप्त करणे.

**पर्यावरण शिक्षणाची वैशिष्ट्ये :-**

1) पर्यावरण शिक्षण सर्व नागरिकांसाठी आहे.
2) पर्यावरणातील सर्व घटकांचा परस्परांवर होणाऱ्या परिणामाचे ज्ञान व आकलन होते.
3) पर्यावरणीय समस्या सोडविण्यासाठी सकारात्मक दृष्टीने व सक्रिय सहभाग महत्वाचा आहे.
4) पर्यावरण समस्या निर्माण होण्याची कारणे व त्या सोडविण्यासाठीच्या उपायांची माहिती होते.
5) पर्यावरणाविषयक जाणीव जागृती निर्माण केली जाते.
6) पर्यावरण संरक्षण व संवर्धन प्रक्रियेत सक्रिय सहभाग मिळविला जातो.
7) पर्यावरण शिक्षणाचे अध्ययन अध्यापनाची योजना, अध्यापन साधने, पध्दती, मूल्यमापनासाठीच्या पध्दती वापरल्या जातात.

**पर्यावरण शिक्षणाची आवश्यकता व महत्व :-**

1) लोकसंख्येचा प्रस्फोट.
2) सुपिक जमिन व वनांचा ऱ्हास होत आहे.
3) साक्षर व निरक्षर अशा सर्वामध्ये जागृतीचा अभाव दिसून येतो.
4) पर्यावरणाविषयक नियम व कायदे शिथिल व मर्यादित स्वरूपाचे आहे.
5) ध्वनी प्रदुषणावर नियंत्रण नाही.

**समारोप :-**

पर्यावरणाशी निगडीत यादी करणे हे एक न संपणारे कार्य आहे. उदा. जमीन, पाणी, हवा, यांचे प्रदूषण, अवकाश व ध्वनिप्रदूषण, पर्यावरणाच्या विविध प्रणालीचे असंतुलन नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास, ओझोन तुटवडा,

वाळवंटीकरण, धास्तावलेले वन्य जीवन, उर्जा आणीबाणी, जमीनीची धूप इ. या व अशा प्रकारच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी पर्यावरण-शिक्षण या शाखेचा उदय झाला आणि उत्तरोत्तर विकास होत आहे. सामाजिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गरजामधून पर्यावरण-शिक्षणाची निर्मिती झाली आहे. पर्यावरणाच्या सद्यस्थितीतील ज्वलंत समस्यांची जगात सर्वत्र शास्त्रज्ञांना जाणीव आहे. वास्तविक सर्वसामान्य माणसाचे अधिक नुकसान होत आहे. मात्र त्याच्या पुढील पिढ्यांना याचे दुष्परिणाम भोगावे लागणार आहे. याची त्यांना फारशी जाणीव असल्याचे दिसत नाही. वास्तव परिस्थिती लक्षात घेऊन जगभरात राजकारणी आणि शासन यांनी पर्यावरणाच्या ऱ्हासाची दखल घेतली आहे. तो थांबवण्यासाठी तसेच याबद्दलची जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी त्या दिशेने त्यांनी पावले टाकली आहेत. नैसर्गिकरीत्या जीवन जगता येईल, निर्सगातील सौंदर्य चिरस्थायी असेल, पुरेशी साधनसंपत्ती उपलब्ध असेल असे जग पुढच्या पिढीला प्रदान करता आले पाहिजे यासाठी पर्यावरण शिक्षणाची नितांत गरज आहे. सुरक्षित, स्वच्छ व आरोग्यदायी पर्यावरण असावे, पर्याप्त अन्नपुरवठा, वन्य पशुपक्ष्यांचे साधन संपत्तीचे संरक्षण व्हावे, प्रत्येक व्यक्तीचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने सुनियोजित व प्रसन्न असे पर्यावरण उपलब्ध व्हावे यासाठी लोक धडपडत असतात. अहोरात्र प्रयत्न करत असतात. प्रत्येक देशात अध्ययनाच्या मुलभूत गरजांचा विचार करतांना या गरजाचाही विचार होणे आवश्यक आहे. आजपर्यंत स्वत:च्या सुरक्षित व सोयीस्कर अस्तित्वासाठी पर्यावरणाचे समायोजन करण्यास शिक्षणाने मानवाला मदत केली आहे. आज लोकांना हे शिकवण्याची गरज निर्माण झाली आहे की, पर्यावरणाकडून फक्त घेऊ नका, तर त्याब–ल काही परत फेड करा. मानवाने जर या जगातील आपले स्थान निश्चित केले आणि आपल्या जबाबदाऱ्या समजून घेतल्या तरच तो पर्यावरणाशी योग्य नाते प्रस्थापित करू शकेल. आजच्या जगात प्रत्येकाला पर्यावरण शिक्षणाचे ज्ञान असले पाहिजे हे निर्विवादपणे मान्य करावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. पर्यावरण शिक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन :- डॉ. किशोर चव्हाण प्रा. शोभा आहेर
2. पर्यावरण शिक्षण :- डॉ. डी. आर. कुलकर्णी
3. पर्यावरण शिक्षण :- डॉ. हेमलता पारसनीस डॉ. जयश्री बहुलीकर
4. प्रदूषणातून पर्यावरणाकडे :- प्रा. डॉ. किशोर पवार प्रा. डॉ. सौ. नलिनी पवार